# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट दिनांक:- २२/०६/२०१८

## वाडीव-हे व घोटी परिसरातील अवैध गावठी दारू हातभट्टयांवर स्थानिक गुन्हे शाखेचे छापे

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांनी आदेशित केले प्रमाणे जिल्हयातील अवैध धंदयाचे समुळ उच्चाटन होणेसाठी अवैधरित्या मद्याची वाहतुक व विक्री करणारे, तसेच हातभट्टीची गावठी दारू तयार करणारे इसमांवर सत्वर कारवाई करण्यात येत आहे. त्यानुसार **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी स्थागुशाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना अवैध धंदयांवर छापे टाकणेसाठी सुचना दिल्या आहे.

दिनांक २१/०६/२०१८ रोजी स्थागुशाचे पथक अवैध धंदयांवर कारवाई करणेसाठी गस्त घालत असतांना पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना मिळालेल्या गुप्त बातमीप्रमाणे इगतपुरी तालुक्यातील वाडीव-हे हद्दीत कृष्णनगर - पारवेवाडी शिवारात दारणा नदी पात्रात काही इसम हे अवैधरित्या हातभट्टीची गावठी दारू तयार करतात बाबत समजले वरुन स्थागुशाचे पथकाने कृष्णनगर शिवारातील दारणा नदी पात्रात अवैधरित्या सुरु असलेले गावठी दारुचे अड्डे उध्वस्त केले. सदर ठिकाणी **इसम नामे १) देवराम गंगाराव पारवे, २) अशोक कचरू पारवे**, दोन्ही रा. कृष्णनगर-पारवेवाडी, ता.इगतपुरी हे दोघे दारणा नदी पात्रात विनापरवाना बेकायदा अंबट उग्र वासाची गावठी दारू तयार करतांना मिळुन आले असुन त्यांचे कब्जातुन गावठी तयार करण्यासाठी लागणारे ५००० लिटर नवसागर मिश्रीत रसायन, २० लिटर तयार गावठी दारू, २५ प्लॅस्टीक व पत्राचे ड्रम, ॲल्युमिनियमचे पातेले व इतर साहित्यसाधने असा **एकुण २ लाख ६९ हजार ५०० रू. किंमतीचा मुद्देमाल जप्त** करण्यात आला आहे. वरील दोन्ही आरोपीतांविरूध्द **वाडीव-हे पोलीस ठाणेस महाराष्ट्र दारूबंदी कायदयान्वये ०२ गुन्हे दाखल** करण्यात आले आहे.

तसेच इगतपुरी तालुक्यातील घोटी हद्दीतील डोंगर द-यांमध्येही काही इसम अवैधरित्या गावठी दारू तयार करतात बाबत खात्रीशीर माहिती मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने पिंपळगाव मोर शिवारातील मोराचा डोंगराचे पायथ्याशी अवैधरित्या सुरु असलेले हातभट्टीची गावठी दारू अड्डयांवर छापे टाकले. सदर ठिकाणी **इसम नामे १) नंदु मेंगाळ, रा. बोरीचीवाडी, ता.इगतपुरी, २) मोहन तांबडु भले, रा. बोरीचीवाडी, ता. इगतपुरी** व एक विधीसंघर्षित बालक असे विनापरवाना चोरटयारितीने हातभट्टीची गावठी दारू तयार करतांना मिळुन आले असुन त्यांचे कब्जातुन गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारे **१२,४०० लिटर** नवसागर मिश्रीत रसायन, ५० लिटर तयार गावठी दारू, ६२ प्लॅस्टिक व पत्राचे ड्रम, ॲल्युमिनियमचे पातेले व इतर साहित्य साधने असा **एकुण ०६ लाख ५५ हजार ३०० रू. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत** करण्यात आलेला आहे. वरील दोन्ही इसमांवर **घोटी पोलीस ठाणेस महाराष्ट्र दारूबंदी कायदयान्वये ०३ गुन्हे दाखल** करण्यात आले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो. व अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड सो. यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे, सपोउनि नवनाथ गुरुळे, पोहवा राजु दिवटे, बंडु ठाकरे, शिवाजी जुंदरे, पोना जालिंदर खराटे, पोकॉ संदिप हांडगे, सचिन पिंगळ, लहु भावनाथ यांचे पथकाने वाडीव-हे व घोटी हद्दीतील अवैध गावठी दारू हातभट्टयांवर छापे टाकुन दारूबंदी कायदयान्वये एकुण ०५ गुन्हे दाखल केले असुन सुमारे ९,२४,८०० रू. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. जिल्हयातील अवैध धंदयांचे समुळ उच्चाटन होणेसाठी आगामी काळात अवैध धंदयांवर सतत कारवाई सुरु राहणार आहे.